## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-३९७७/२०२४

**अपिलार्थी, श्री.शशिकांत शांताराम माळी**

**बी ५०४, वसंत बहार, सी एस एस सेक्टर ११, प्लॉट नं.०५**

**कामोठे, नवी मुंबई ४१० २०६**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई
आर बी आय बॅकसमोर, सेक्टर १०
सी बी डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा
सहायक पोलीस आयुक्त प्रशासन नवी मुंबई,
पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई
आर बी आय बॅकसमोर, सेक्टर १०
सी बी डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १.८.२०२३ | ---- | ९.१०.२०२३ | १८.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि.१०.११.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "माझे विरुध्द झालेले चौकशीचे कागदपत्रे मिळणेबाबत." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद तोरडमल आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. धर्मपाल मोहन बनसोडे, सहा. पोलीस आयुक्त, (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"(१) *अर्जदार मपोशि १२२२० सविता करपे यांनी आमच्या विरुध्द केलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत.*

*(२) अर्जदार यांनी चौकशीमध्ये दिलेल्या जबाबाची साक्षांकित प्रत.*

*(३) अर्जचौकशीमध्ये साक्षीदारांचे घेण्यात आलेल्या जबाबाची साक्षांकित प्रत.*

*(४) अर्जचौकशीच्या अंतिम अहवालाची साक्षांकित प्रत."*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती मिळाली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थीनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, "१. अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी हजर, मपोशि-१२२२०/सविता करपे यांनी माहिती देण्यात येऊ नये असे लिहून दिले असल्याने माहिती देण्यात आली नाही. अपिल निकाली काढण्यांत येत आहे." असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांचेविरुध्द त्यांचेसोबत काम करणा-या महिला कर्मचा-याने लैंगिक छळाबाबतची तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या आधारावर विभागांतर्गत चौकशी होऊन ३ वेतनवाढी रोखण्याची त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. तथापि, याविरुध्द त्यांना अपिल करावयाचे आहे व त्यांना या अपिलामध्ये संबंधित महिला कर्मचा-याने त्यांचेविरुध्द दाखल केलेल्या अर्जाची प्रत त्यांना हवी आहे. स्वत:चा बचाव करण्यासाठी त्यांना सदरचा अर्ज, साक्षीदाराने दिलेला जबाब व चौकशी अधिका-यांचा अहवाल ही माहिती त्यांना हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ज्या कर्मचारी महिलेने अपिलार्थी विरुध्द लैंगिक छळाची तक्रार केली आहे त्याबाबत त्यांनी सदरची माहिती पुरविण्यास विरोध केला आहे. त्यांनी दि.४.१०.२०२३ रोजी पोलीस उप आयुक्त, (मुख्या), नवी मुंबई यांना दिलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, ही माहिती अपिलार्थींना पुरविल्यास त्यांना शारीरीक व मानसिक दुखापत नमुद अंमलदार यांचेकडून करण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. तरी चौकशी दरम्यान त्यांनी दिलेल्या जबाबाच्या तसेच इतर कोणतेही कागदपत्र अपिलार्थींना पुरविण्यात येऊ नये.

संबंधित महिला कर्मचा-याने अशा प्रकारची विनंती केल्यामुळे अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (छ) नुसार ही माहिती पुरविण्यात आलेली नाही.

**सबब, दोन्ही बाजूंचा युक्मिवाद विचारात घेता प्रकरण आदेशाकरीता बंद करण्यात येत आहे.**

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मे, २०२४